सातारा, सोमवार, १३ फेब्रुवारी २०१७ । किंमत ₹ ४

सकाळ

महाराष्ट्रातील नंबर 1 वृत्तपत्र

डी. पी. भोसले कॉलेज ग्रंथालय कोरेगांव

## डी. पी. भोसले कॉलेजात आज चर्चासत्रे

सातारा, ता. १२ : रयत शिक्षण संस्थेच्या कोरेगाव येथील डी. पी. भोसले महाविद्यालयात उद्या (सोमवारी) मानसशास्त्र, शारीरिक शिक्षण व ग्रंथालय या विभागांच्या वतीने तीन राष्ट्रीय चर्चासत्रांचे आयोजन करण्यात आले आहे. या चर्चासत्रांचे उद्‌घाटन सुप्रसिद्ध विचारवंत प्राचार्य डॉ. श्रीपाल सबनीस यांच्या हस्ते, रयत शिक्षण संस्थेच्या उच्च शिक्षण विभागाचे सहसचिव प्राचार्य डॉ. दीनानाथ पाटील यांच्या अध्यक्षतेखाली होणार आहे. 'मानसशास्त्र'च्या वतीने 'प्रसारमाध्यमांचा तरुण पिढीवरील मानसशास्त्रीय प्रभाव', 'शारीरिक शिक्षण'च्या वतीने 'स्वास्थ्य व कल्याण : समस्या व उपाय', तर 'ग्रंथालय'च्या वतीने 'शैक्षणिक ग्रंथालय व सेवा यामधील नवे बदलते प्रवाह' या विषयावर चर्चासत्रे होणार आहेत. या चर्चासत्रांसाठी मान्यवर उपस्थित राहणार असल्याची माहिती महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विजयसिंह सावंत, प्रा. एस. एन. कोळेकर, प्रा. बाळासाहेब भोसले व प्रा. चंद्रशेखर खैरनार यांनी दिली.